[वेळ : 3.00 तास ] [एकूण गुण : 100 ]

**कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.**

**सूचना : १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**
**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.**
**३. प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.**

**प्र. १ अ.** भाषांतर या संकल्पनेचे स्वरूप सांगून शास्त्रीय ग्रंथ व धार्मिक ग्रंथाचे भाषांतर करण्याऱ्या पद्धतीचे विवेचन करा. २०

**किंवा**

**ब.** ललित साहित्याच्या भाषांतरामध्ये सांस्कृतिक भेदाचे संदर्भ ध्यानात घेणे कितपत महत्त्वाचे असते ते साधार नमूद करा.

**प्र. २ अ.** ललित साहित्याचे भाषांतर करत असताना कोणकोणत्या स्वरूपाच्या शैलीविषयक समस्या उभ्या राहतात त्याचा आढावा घ्या. २०

**किंवा**

**ब.** भाषांतराबाबतची विविध अभ्यासकांची मते सांगून भाषांतर करत असताना साहित्यप्रकारांचा विचारही कसा महत्त्वाचा असतो ते सांगा.

**प्र.३ अ. १. इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा.** १०

**Bhimrao Ramji Ambedkar** was an Indian economist, jurist, social reformer and political leader who chaired the committee that drafted the Constitution of India based on the debates of the Constituent Assembly of India and the first draft of Sir Benegal Narsing Rau. Ambedkar served as Law and Justice minister in the first cabinet of Jawaharlal Nehru. He later converted to Buddhism and inspired the Dalit Buddhist movement after renouncing Hinduism.

His later life was marked by his political activities; he became involved in campaigning and negotiations for partition, publishing journals, advocating political rights and social freedom for Dalits, and contributing to the establishment of the state of India.

**किंवा**

**२. हिंदी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा.**

पर्यावरण के किसी भी तत्व में होने वाला वो बदलाव जिसका धरती पर मौजूद जीवों पर बुरा प्रभाव पड़ता है, प्रदूषण कहलाता है. वातावरण में मौजूद हानिकारक जीवन नाशक और जहरीले पदार्थ एकत्रित होकर इसे प्रदूषित कर देते हैं. प्रदूषण के जिम्मेदार इन पदार्थों को **प्रदूषक** कहा जाता है. ये प्रदूषक प्राकृतिक (natural) भी हो सकते हैं जैसे ज्वालामुखी की राख और गैसें और ये मानव गतिविधियों से भी उत्पन्न हो सकते हैं, जैसे फैक्ट्रियों से उत्पन्न होने वाला कचरा या विषैला तरल. ये प्रदूषक हवा, पानी और जमीन की गुणवत्ता को नुकसान पहुंचाते हैं. प्रदूषण एक वैश्विक समस्या है. हालांकि शहरी इलाके ग्रामीण इलाकों की अपेक्षा अधिक प्रदूषित हैं. प्रदूषण उन जगहों में भी दूर तक फ़ैल सकता है जहाँ लोग नहीं रहते हैं. उदाहरण के लिए कीटनाशक और दूसरे विषैले केमिकल्स अंटार्कटिका की बर्फ की चादर में पाए जा चुके हैं.



XSAGARDADMINY89B8DCXSAGARDADMINY89B8DC

**ब.** १.**मराठी उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा.** १०

संस्कृत भाषेतील अक्षर बोधकथांचा जगद्विख्यात संग्रह म्हणजे पंचतंत्र. त्याचे एकूण पाच भाग प्रत्येक भागात 'तंत्र' अशी संज्ञा आहे. प्रत्येक भागाचा विस्तार एका मुख्य कथेच्या आधारे दुसऱ्या कथा रचून केला गेला असल्यामुळे त्याला 'तंत्र' ही संज्ञा दिली गेली असणे शक्य आहे. पंचतंत्राच्या आरंभी एक लहानसे 'कथामुख' आहे. त्यात ह्या संग्रहातील कथा कोणत्या निमित्ताने सांगितल्या गेल्या, त्याची माहिती आहे.

पंचतंत्रातील कथांमधून प्राण्यांच्या माध्यमातून नीती सांगितली आहे. त्यातून माणसांना व्यावहारिक मार्गदर्शन केलेले आढळते. हा विचार मानवाच्या नेहमीच्या जगण्याशी निगडित असल्याने तो परिणामकारक वाटतो. जीवनाचा अर्थ उलगडून सांगितल्याने त्या कथा लोकप्रिय झाल्या. पंचतंत्राच्या कथेतील निवेदनाची एक वैशिष्ट्यपूर्ण शैली आहे. कथेच्या प्रारंभी एखादी काव्यपंक्ती येते. पुढे गद्यातील विवेचनाच्या समर्थनासाठी सुभाषिताचा वापर केलेला असतो.

**किंवा**

२. **मराठी उताऱ्याचे हिंदीमध्ये भाषांतर करा.**

महागाईचा अर्थ आहे – जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ. अन्न,वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य आणि मनोरंजन या मानवाच्या आवश्यक गरजा आहेत. जर सामान्य माणसाच्या गरजांची पूर्तता अगदी सहजपणे होत असेल तर महागाईचा प्रश्नच उभा राहत नाही. परंतु विविध कारणांमुळे बाजारातील वस्तूंच्या किंमती वाढत जातात. जेव्हा या किमती सामान्य माणसाच्या हाताबाहेर वाढू लागतात, तेव्हा त्या परिस्थितीला 'महागाई' चे नाव दिले जाते. गेल्या काही वर्षांपासून महागाईने लोकांचे जगणे मुश्कील केले आहे.

दुष्काळ,महापूर , बर्फवृष्टी, यासारख्या नैसर्गिक संकटांमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. त्यामुळे अन्न-धान्याची कमतरता मोठ्या प्रमाणावर भासते. या कमतरतेमुळे बाजारामध्ये तांदूळ, कडधान्ये, फळे आणि भाज्या यांच्या किंमती वाढू लागतात. उत्पादनाची विक्री वाढल्यामुळे उत्पादित वस्तूच्या किमती वाढू लागतात. कोळसा, पेट्रोल, डीझेल इत्यादी वस्तूंच्या किंमती वाढल्यामुळे महागाई वाढते. जेव्हा वाढत्या लोकसंख्येला आवश्यक असणाऱ्या वस्तूंचे उत्पादन होत नाही, तेव्हा महागाई वाढू लागते. भ्रष्टाचार, साठवणूक या कारणांनीसुद्धा वस्तूंच्या किंमतीमध्ये वाढ होते .

**प्र. ४ अ.** कोशरचनेतील 'अकारविल्हे' ही संकल्पना विस्ताराने नमूद करा. २०

**किंवा**

**ब.** 'कोश' म्हणजे काय ते सांगून कोशातील नोंदी कशा पद्धतीने केल्या जातात ते विस्ताराने सांगा.

**प्र.५** पुढीलपैकी कोणत्याही **दोन टिपा** लिहा. २०

**अ.** अनुवाद संकल्पना

**ब.** भाषांतर आणि प्रतिमा

**क.** मराठी भाषेचे रचनाविशेष

**ड.** सूची वाङ्मय

*************



XSAGARDADMINY89B8DCXSAGARDADMINY89B8DC